माहिती हवीय?

रविकांत रोहिदास साखरे, जामखेड.

□ दिनकर द. पाटील यांनी दिग्दर्शित केलेले चित्रपट कोणते?

— *राम राम पाव्हणं, पाटलाचा पोर, शारदा, मायबहिणी, तारका, कुलदैवत, मूठभर चणे, दिसतं तसं नसतं, देव जागा आहे, नवरा म्हणून नये आपला, भैरवी, उमज पडेल तर, माझी आई, बाप माझा ब्रह्मचारी, प्रेम आंधळं असतं, वरदक्षिणा, कामापुरता मामा, मल्हारी मार्तंड, सुरंगा म्हंत्यात मला, धन्य ते संताजी धनाजी, कोर्टाची पायरी, काळी बायको, अधिकार, कुंकू माझं भाग्याचं, सूनबाई ओटी भरून जा, सवत, सुळावरची पोळी, कुंकवाचा टिळा, सुलक्षणा, भटक भवानी, सोना आणि मोना, शिवरायाची सून ताराराणी.*

□ कोणकोणत्या हिंदी अभिनेत्यांनी मराठी चित्रपटात नायकाची भूमिका केलीय?

— चंद्रमोहन (*गीता, आपलं घर*), जयराज (*छोटा जवान, फकिरा*), जॉनी वॉकर (*श्रीमंत मेहुणा पाहिजे*), मेहमूद (*या सालक*), गिरीश कर्नाड (*उंबरठा*), जॅकी श्रॉफ (*उपकार दुधाचे!*)

□ *तोतया आमदार, देवकीनंदन गोपाला, जिद्द, भैरू पैलवान की जय, शरण तुला भगवंता, असला नवरा नको ग बाई* या चित्रपटातील नायक-नायिका कोण? संगीतकार कोण?

— *तोतया आमदार* (नायक-नायिका: अरुण सरनाईक-उषा नाईक, संगीत: राम कदम), *देवकीनंदन गोपाला* (नायक-नायिका: डॉ.श्रीराम लागू-आशा पोतदार, संगीत: राम कदम), *जिद्द* (नायक-नायिका: डॉ.लागू-जयश्री गडकर, संगीत: पांडुरंग दीक्षित), *भैरू पैलवान की जय* (नायक-नायिका: यशवंत दत्त-उषा चव्हाण, संगीत: प्रभाकर जोग), *शरण तुला भगवंता* (नायक-नायिका: अरुण सरनाईक-कानन कौशल, संगीत: नागेश राज), *असला नवरा नको ग बाई* (नायक-नायिका: राजा गोसावी-रंजना, संगीत: राम कदम).

भरत चंद्रकांत कालुवाला, माहीम, मुंबई.

□ *आयो सावन ऋतु आयी* हे शमशादने गायलेलं गाणं कोणत्या चित्रपटातील आहे?

— १९४८च्या *मेला* या चित्रपटातील. पण हे गाणं शमशादने एकटीने गायलेलं नाही. या गाण्यात तिच्याबरोबर मुकेशचा आवाजदेखील आहे.

संतोष चं. हालकुडे, कुर्डुवाडी.

□ किशोरकुमारने किती वेळा विवाह केला?

— चार वेळा. पहिला विवाह रुमादेवीशी. तिला घटस्फोट दिल्यावर मधुबालाशी. तिच्या निधनानंतर योगिता बालीशी. तिला घटस्फोट दिल्यावर लीना चंदावरकरशी.

मनोज निवास कामत, कोल्हापूर.

□ जितेंद्रचा पहिला चित्रपट कोणता? श्रीदेवीबरोबर तो कोणकोणत्या चित्रपटात चमकला?

— *नवरंग*मध्ये तो एक्स्ट्रा म्हणून चित्रपटात आला. त्यानंतर *सेहरा*त काही प्रसंगात तो संध्याची डमी बनला. १९६४चा *गीत गाया पत्थरों ने* त्याने नायकाची भूमिका केलेला पहिला चित्रपट. *हिम्मतवाला, आग और शोला, बलिदान, जस्टिस चौधरी, मकसद, मवाली, तोहफा, अकलमंद, घर संसार, सुहागन, सरफरोश, औलाद, धर्मअधिकारी, मजाल, हिम्मत और मेहनत, सोने पे सुहागा* हे त्याने श्रीदेवीबरोबर भूमिका केलेले चित्रपट.

रविकांत रोहिदास साखरे, जामखेड.

□ नसीरुद्दीन शाहने कोणकोणत्या चित्रपटात खलनायकाची भूमिका केलीय?



सरफरोशमध्ये नसीरुद्दीन शाह-आमिर खान

— *कन्हैया, बेजुबान, मोहरा, राजकुमार, सरफरोश.*

बापूराव पाटील, पुणे.

□ श्रीकांत मोघेने कोणकोणत्या मराठी चित्रपटात नायकाची भूमिका केली?

— *प्रपंच, संत निवृत्ती ज्ञानदेव, दैव जाणिले कुणी, आम्ही जातो अमुच्या गावा, जिव्हाळा, नंदिनी, अनोळखी, मला देव भेटला.*

सुषमा भोसले, अमरावती.

□ अशोककुमारने निरूपा रॉयबरोबर कोणत्या चित्रपटात सर्वात प्रथम भूमिका केली?

— १९५६च्या *भाई भाई* या चित्रपटात.

संजीवनी अनंता कोळी, अंतोरे, पेण.

□ धर्मेंद्र व सनी यांनी एकत्र भूमिका केलेले चित्रपट कोणते?

— *सनी, सल्तनत, वर्दी, क्षत्रिय.*

अशोक वा. कोर्टीकर, पंढरपूर.

□ 'ये खामोशीयां, ये तनहाईया, मुहब्बत की दुनिया है कितनी जवाँ...' हे गाणे कोणत्या चित्रपटातील? गीतकार, संगीतकार, कलाकार कोण?

— रफी व आशाने गायलेले हे गाणे १९६३च्या *यह रास्ते है प्यार के* या चित्रपटात होते. गीतकार राजेंद्र कृष्ण, संगीतकार रवी, कलाकार: अशोककुमार, मोतीलाल, सुनील दत्त, लीला नायडू, रहमान, शशिकला, राजेंद्रनाथ, हरी शिवदासानी, बेबी फरिदा, मनमोहन.

सोहेल लहू कोळी, वरेडी.

□ निळू फुलेंचा पहिला चित्रपट कोणता?

— *एक गाव बारा भानगडी.*

अशोक पाटील, कोल्हापूर.

□ सुरैयाचा शेवटचा चित्रपट कोणता?

— *रुस्तुम सोहराब.*

□ बेबी शकुंतलाचा शेवटचा चित्रपट कोणता?

— *सौभाग्य.*

प्रकाश घाटगे, कोल्हापूर.

□ दिनकर द. पाटील यांनी दिग्दर्शित केलेला पहिला चित्रपट कोणता?

— *राम राम पाव्हणं.*

□ अशोककुमारने कोणत्या चित्रपटात सर्वात प्रथम डबल रोल केला?

— बी.आर.चोप्रांच्या *अफसाना* या चित्रपटात.

□ राज कपूरने कोणकोणत्या चित्रपटात डबल रोल केलाय?

— *पापी* या एकमेव चित्रपटात.

□ हृषिकेश मुखर्जींनी दिग्दर्शित केलेला पहिला चित्रपट कोणता?

— *मुसाफिर.*

□ अभिनेता बनण्यापूर्वी मेहमूद ड्रायव्हर होता हे खरं का?

— होय. पी.एल.संतोषी, गुरुदत्त व शक्ती सामंता यांच्याकडे तो ड्रायव्हर म्हणून नोकरीला होता.

□ गुरुदत्त यांच्या *सी. आई. डी.*त खलनायकाची भूमिका करणारा अभिनेता कोण?

— बीर सखुजा. ●